# एमआयटी कॉलेजमध्ये पालकांसाठी आरोग्य शिबिर

वैजापूर, दि. ३ (सा.वा.) - तालुक्यातील रोटेगाव येथील एमआयटी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी संस्थेतील सिव्हिल कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स आणि मेकॅनिकल इंजिनीअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. एकूण २७९ पालक आणि विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. संभाजीनगर येथील डॉ.अंकित जैन, डॉ. विक्रम भोकरे, डॉ.योगेश पांडे, डॉ. मयूरी शिंदे यांनी पालक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली.

संस्थेचे प्राचार्य प्रा.एम.आर. वैद्य म्हणाले की, मुलांच्या प्रगतीबरोबरच पालकांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी पालकांनीही नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. डॉ. अंकित जैन यांनी ग्रामीण भागात अजूनही दवाखान्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविल्या जात नसल्याने चांगल्या आरोग्यासाठी जनजागृती करणे गरजेचे असून, यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.व्ही.जी.तळेकर, प्रा.ए.एस. नागरिक, प्रा.एस.एन.पाठक, प्रा.व्ही.एम.जाधव, प्रा.जी.ए.भिसे व प्रा.वाय.के.धोत्रे, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स विभागातील प्रा. वैशाली जोशी, प्रा.विजया धोपटे, प्रा.साईनाथ गायके, प्रा.अमोल देवडे, प्रा.गणेश पुरी व प्रा. विवेक जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.वाय. ए.कवडे, महासंचालक प्रा. मुनीष शर्मा, संचालक प्रा. डॉ.शकुंतला लोमटे, संचालक प्रा. बिजली देशमुख आदींनी अभिनंदन केले.